रयत शिक्षण संस्थेचे ,
चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज हुपरी
समाजशास्त्र विभाग व इतिहास विभाग आयोजित
अभ्यास भेट

# अभ्यास भेट अहवाल

चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज हुपरी च्या समाजशास्त्र व इतिहास विभाग यांच्या संयुक्तविद्यमाने शैक्षणिक सहल शुक्रवारी दिनांक 20/05/2022 रोजी आयोजित करण्यात आली होती या शैक्षणिक सहलीत शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग तसेच न्यू पॅलेस , अंबाबाई मंदिर, शाहू मिल, कोल्हापूर छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र या ठीकाणाना भेटी देण्यात आल्या .

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाला सर्व विद्यार्थ्यांनी भेट दिली या भेटीदरम्यान त्या विभागाचे विभाग प्रमुख डॉक्टर जगन्नाथ कराडे व इतर प्राध्यापक वृंद यांनी मुलांना मार्गदर्शन केले बी ए समाजशास्त्र पूर्ण केल्यानंतर विद्यापीठात प्रवेश कसा घ्यावा तसेच समाजशास्त्र मध्ये असणाऱ्या विविध करिअरच्या संधी सांगण्यात आल्या समाजशास्त्र हे फक्त शास्त्र नसून ते उपयोजित शास्त्र आहे याची माहिती देण्यात आली तसेच समाजशास्त्र विभाग प्रवेश घेण्यापासून ते विभागातील सर्व घडणाऱ्या घडामोडींचे माहिती समाजशास्त्र विभागातील शिक्षकांनी दिली तसेच विभागातील संगणक कक्ष व विभागाचे ग्रंथालय हे सुद्धा आम्हाला पहावयास मिळाले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नोत्तरांचा व विविध शंकेचं निरसन समाजशास्त्र विभागातील विभाग प्रमुख जगन कराडे व प्रतिमा देसाई व इतर शिक्षक वृंद यांनी केले . इतिहास विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक विजय पाडळकर यांनी शिवाजी विद्यापीठातील 36 विभाग व 12 अध्यासन केंद्र यासंदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच शिवाजी विद्यापीठांमध्ये चालणाऱ्या संशोधनाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली

शिवाजी विद्यापीठातील बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रास भेट देण्यात आली यावेळी इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. विजय पाडळकर यांनी स्पर्धा परीक्षा व आयुष्यात यशस्वी होण्यासाठी विद्यापीठात प्रवेश कसा घ्यावा व स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले कोल्हापुरातील न्यू पॅलेस या वस्तुसंग्रहालयात इतिहास व समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली यावेळी छत्रपती शाहू महाराज यांच्या काळातील पोशाख लष्करी हत्यारही विविध तलवारीसह अनेक वस्तू या पहावयास मिळाल्या त्या कालखंडातील असणारी प्रशासन व्यवस्था त्याकाळात असणारे एकूणच व्यवस्था त्यावेळी अनेक कागदपत्रे या वस्तू विद्यार्थ्यांना पाहता आली. विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी म्हणून शाहू मिल याठिकाणी भेट देण्यात आली याच ठिकाणी खाद्य-यात्रा व हापूस आंबा महोत्सव ही बघण्यात आला विद्यार्थ्यांनी उद्योजक कसे व्हावे किंवा व्यवसाय कसा करावा यासंदर्भात प्रात्यक्षिक ज्ञान या खाद्या जत्रेतून देण्यात आलं व शाहू मिल चा इतिहासाची माहिती इतिहास चे प्रमुख डॉ. विजय पाडळकर यांनी दिली. कोल्हापुरातील अंबाबाई मंदिरास यावेळी भेट घेण्यात आली

या शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या मा.डॉ.पी बी. पाटील , समाजशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.श्री. सलीम शेख व डॉ. विजय पाडळकर यांच्या मार्गदर्शनाखाली समाधान जाधव व तानाजी मोहिते यांनी या शैक्षणिक सहलीचे आयोजन व शैक्षणिक सहल यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले

Head
Department of Sociology
C.S.S College Hupari

प्राचार्य
चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज,
हुपरी.

Scanned with OKEN Scanner